महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**दिनांक :३०/१०/२०२२**

---

## मोटर सायकल चोरी व घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखे कडुन अटक

यवतमाळ शहरातील वाढत्या घरफोडी व मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी सदर गुन्हयांचा समांतर तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी स्था.गु.शा. कडील पथकांना दिलेल्या निर्देशावरुन दिनांक २९/१०/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे अउघड गुन्हे उघडकीस आणण्याकरीता पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराने दिलेल्या बातमीचे अनुषंगाने रेकॉर्डवर असलेला सराईत गुन्हेगार **सतीष उर्फ मुंगश्या उर्फ शेंबडया बाबाराव मडावी** वय २६ वर्ष रा. दादाबादशहा नगर, राळेगांव ह.मु. तलाव फैल यवतमाळ यास चोरीच्या मोटरसायकल सह ताब्यात घेतले असता सदर इसमाने राळेगांव येथील मोटर सायकलचे शोरुम फोडुन त्यामधुन मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास विश्वासात घेवुन कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता आरोपीने आणखी तीन मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली नमुद आरोपी कडुन पो.स्टे. पांढरकवडा येथील गुन्हयातील एक मोटर सायकल व दोन मोपेड जप्त करण्यात आल्या आहेत.

सदर गुन्हयातील आरोपीत इसम हा चोरी घरफोडी करणारा व सराईत असल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनात ईन्ट्रॉगेशन स्कीलचा वापर करुन अत्यंत बारकाईने विचारपुस केली असता नमुद आरोपी याने पो.स्टे. राळेगांव हद्यीतील एक कापड दुकान फोडुन कपडे व नगदी चोरी केल्याची कबुली दिली तसेच नमुद आरोपीने यवतमाळ येथील पाणी पुरवठा योजनेचे तिन नग लोखंडी वॉल्व्ह त्याचे साथीदार नामे १) दिपक फुंडे रा. यवतमाळ २) अक्षय सहारे रा. यवतमाळ ३) जाकीर खान गफार खान रा. यवतमाळ यांचे सोबत मीळुन चोरी केल्याचे सांगीतल्याने दिपक फुंडे याचे गोडावुन मधुन ३,२०,०००/- रु किमतीचे लोखंडी वॉल्व्ह जप्त करण्यात आले असुन आरोपीतांनी नेमके कोठुन चोरी करुन आणले आहेत याबाबत अधिक तपास सुरु आहे.

सदर आरोपीत इसम **सतीष उर्फ मुंगश्या उर्फ शेंबडया बाबाराव मडावी** वय २६ वर्ष रा. दादाबादशहा नगर, राळेगांव ह.मु. तलाव फैल यवतमाळ याचेवर यवतमाळ, नागपूर, वर्धा जिल्हयात एकुण ३० चोरी, घरफोडीचे गुन्हे नोंद आहेत. सदर आरोपीकडुन अद्यापपावेतो **चार मोटर सायकल किंमत १,६४,८००/- रु** व **पाणीपुरवठा योजनेचे तिन नग लोखंडी व्हॉल्व्ह ३,२०,०००/- रु असा एकुण ४,८४,८००/- रु चा मुद्येमाल** हस्तगत करण्यात आला असुन आरोपी कडुन पांढरकवडा, यवतमाळ व इतर ठिकाणचे मोटर सायकल चोरी, घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. खंडेराव धरणे, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि गणेश वनारे, सपोनि विवेक देशमुख, पोउपनि सागर भारस्कर, शाम बोपचे, पोहवा बंडु डांगे, राहुल गोरे, योगेश डगवार, उल्हास कुरकुटे, पो.ना.सुभाष किन्नाके, महेश नाईक, विनोद राठोड, सतीष फुके, धनंजय श्रीरामे, रजनिकांत मडावी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

30.10.22

**(प्रदीप परदेशी)**
पो.नि.स्था.गु.शा. यवतमाळ

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**दिनांक :३०/१०/२०२२**

---

# मोटर सायकल चोरीतील आरोपी जेरबंद
# नेर पोलीस स्टेशनची कामगिरी

फिर्यादी नामे प्रकाश लालसिंग राठोड वय ५२ वर्षे, रा. वाई हातोला ता. जि. यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन येथे जबानि रिपोर्ट दिला की, दिनांक ०७/१०/२०२२ रोजी १२/३० वा. दरम्याण ते कामानिमीत्त आटवडी बाजार नेर येथे आले असतांना त्यांचे मालकीची हिरो होन्डा स्प्लेंडर काळया रंगाची एम.एच.२९ ए एफ ५९७५ क्रमांकाची किमंत २५,००० रु असलेली आटवडी बाजार परिसरात उभी ठेवुन बाजार करीत असतांना सदरची मोटार सायकल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली अशा रिपोर्ट वरुन पो.स्टे. नेर येथे अप.क्र. ४६९/२२ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपास करण्यात आला.

गुन्हयाचे तपासा दरम्याण पो.स्टे. नेर येथे अप.क्र. ४६९/२२ कलम ३७९ भादवि गुन्हयातील हिरो होन्डा स्प्लेंडर काळया रंगाची एम.एच.२९ ए एफ ५९७५ क्रमांकाची किमंत २५,००० रु असलेली मो.सा. ही पोलीस स्टेशन सावंगी मेघे जि. वर्धा येथे दाखल अप.क्र. ५७५/२०२२ कलम ३७९ भादवि गुन्हयात अटक असलेल्या आरोपी नामे गुरुजितसिंग रुपसिंग खिच्ची वय ३५ वर्षे, रा. बोरगांव मेघे सिख बेडा वर्धा याचेकडुन दिनांक १३/१०/२०२२ रोजी जप्त करण्यात आलेली होती. अशी माहिती मिळाल्यावरुन सदर मो.सा. ही आरोपी नामे गुरुजितसिंग रुपसिंग खिच्ची वय ३५ वर्षे, रा. बोरगांव मेघे सिख बेडा वर्धा यानेच चोरल्याचे निश्चीत झाल्याने त्यास अटक करणे कामी नेर पोलीस स्टेशन येथील पो.स्टाफ गेला असता आरोपी हा पोलीसांचा सुगावा लागताच पळुन गेला. दरम्याण दिनांक २७/१०/२०२२ रोजी आरोपी गुरुजितसिंग रुपसिंग खिच्ची हा ग्राम मुकींदपुर येथे आला असल्याची गोपनीय माहिती पोलीस स्टेशन नेर येथे मिळाली वरुन त्यास ताब्यात घेवुन दिनांक २८/१०/२०२२ रोजी अटक करण्यात आली. सदर आरोपीचा विद्यमान JMFC सा.कोर्ट नेर येथुन MCR झाला असुन आरोपी सध्या यवतमाळ कारागृहात आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. खंडेराव धरणे, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शनात श्री. रामकृष्ण जाधव पोलीस निरीक्षक पो.स्टे. नेर, पोहवा सुभाष ठाकरे, पोना पवन चिरडे, निलेश सिरसाठ पो.स्टे. नेर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

३०.१०.२२

**(प्रदीप परदेशी)**
पो.नि.स्था.गु.शा. यवतमाळ